




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

तमाम जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ८५ वा | बुधवार, दि. २२ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कलंकित भ्रष्टाचारी दिलीप मानेला भाजपात प्रवेश नको

## पालकमंत्री गोरेंच्या ऑपरेशन लोटसला धक्का

## फोडाफोडीच्या डावानंतर भाजपमध्येच फटाके फुटण्यास सुरुवात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पालकमंत्री आणि राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नातून चार माजी आमदार भाजप प्रवेश करणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या तोंडावर भाजपचे ऑपरेशन लोटस जोरदार सुरु झाले. मात्र भाजपच्या ऑपरेशन लोटस विरोधात भाजपच्याच कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयासमोर मंगळवारी धरणे आंदोलन केले. भाजप कार्यकर्त्यांनी प्रतिक्रिया देताना तीव्र शब्दांत विरोध केला असून कलंकित भ्रष्टाचारी दिलीप मानेला भाजपात स्थान नको अशी ठाम भूमिका मांडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांना 440 व्होल्टचा झटका देतानाच पालकमंत्रिपद असलेल्या सोलापूरमध्ये फोडाफोडीच्या राजकारणाचा नवा डाव टाकला आहे. मात्र,या डावानंतर सोलापूर भाजपमध्येच फटाके फुटण्यास सुरुवात झाली आहे.

**नाव न घेता माजी आमदारांना विरोध**

भाजपमध्ये सर्वकाही आलबेल नसल्याचं चित्र आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांनी एकत्रित येत भाजपच्या मुख्य कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील माजी आमदार दिलीप माने हे लवकरच भाजप प्रवेश करणार आहेत. दिलीप मानेंचं नाव न घेता जबरदस्त विरोध करत भाजपमधील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयासमोर आंदोलन केले आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरेंच्या ऑपरेशन लोटसला भाजपमधून विरोध होत असल्याने राज्यातील भाजपला जबर धक्का बसला आहे.




**ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरेंच्या ऑपरेशन लोटसला धक्का**

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे सोलापूर जिल्ह्यात ऑपरेशन लोटस राबवत आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील काँग्रेस नेते आणि माजी आमदार दिलीप माने यांचा भाजप पक्षप्रवेश अत्यंत महत्वाचा आहे. मात्र दक्षिण सोलापूर तालुक्यात भाजप आमदार सुभाष देशमुख यांचे वर्चस्व आहे. दिलीप (पान 2 वर..)



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जर उद्या काही गडबड झाली, जर जिल्हा परिषदेचे अर्धे सदस्य निघून गेले तर याचा आम्हाला धोका आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील कार्यकर्ते माझ्याकडे आले होते आणि ते माझ्यासोबत भांडत होते. पण मी त्यांना पक्षनेतृत्वानं हा निर्णय घेतला आहे, त्यामुळे त्या निर्णयाशी सहमत राहिलं पाहिजे. पण कार्यकर्त्यांमध्ये लोकसभा, विधानसभेत आमच्याकडून काम करून घ्यायचं, आमच्या निवडणुका आल्या की, आम्हाला भागीदार करायचं, ही भावना असल्याचंही सुभाषबापूंनी बोलून दाखवलं.

मी कोणत्याही बैठकीला नाही, जेवढे माध्यमांमध्ये येते तेवढेच ऐकतो आहे. सहा माजी आमदार येत असतील तर त्यातून धोका निर्माण होऊ शकतो. सर्वांची पार्श्वभूमी काँग्रेसची असल्यामुळे हे सर्व सोपं नाही. मला तर असं वाटतं की, गुप्तचर पद्धतीने ते आत आले आहेत, गट्टाच्या गट्टा घेऊन जाण्याची भीती आहे. पक्षाने या निर्णयाचा विचार करावा असा सल्लाही सुभाष देशमुख यांनी दिला.

# पूरग्रस्थाची दिवाळी अंधारात; सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अजूनही मदतीच्या प्रतीक्षेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अतिवृष्टी आणि महापूरामुळे शेती पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शासनाकडून जाहीर करण्यात आलेली मदत देखील शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेली नाही.

परिणामी या नुकसानग्रस्त शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असून त्यांची दिवाळी अंधारातच जात असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.

सोलापूरसह राज्यातील शेतकऱ्यांचे महापूरामुळे मोठे नुकसान झाले आहे. नूकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी मदत दिली जाईल; असे आश्वासन सरकारने दिले होते. दिवाळी सण संपत आला तरी अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम जमा झाली नसल्याचे पाहण्यास मिळत आहे. यामुळे शेतकरी शासनाकडून देण्यात येत असलेल्या निधी मिळण्याच्या प्रतीक्षेत आहे.



**केंद्र सरकारच्या मदतीकडे बोट :** सरकारकडून नूकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकय्रांना सुमारे ९२७ कोटींच्या मदतीचा शासनाने जीआर काढला आहे. जाहीर केलेल्या पॅकेजमधून एकही शेतकरी वंचित राहणार नाही; असे आश्वासन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले असले तरी त्यांनी केंद्र ससरकारच्या मदतीकडे बोट दाखवले आहे. त्यामुळे सरकारची मदत कधी मिळणार याकडेच शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**कृषिमंत्र्यांची कबुली :** दरम्यान नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली आहे. सरकारने जाहीर केलेली मदत अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान केंद्र सरकारला नुकसान झालेल्या पंचनाम्याची अचुक माहिती द्यायची असल्याने थोडा उशीर होतो; अशी कबुलीही कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्राकडे बोट दाखवले आहे.







## संपादकीय

# संस्कृतीचा शाश्वत दीप

दिवाळी सणाच्या मागे हजारो वर्षांचा सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक वारसा दडलेला आहे. आजच्या युगात स्वरूप बदलले असले तरी आत्मा आजही तितकाच तेजस्वी आणि शाश्वत आहे. जुन्या काळातील दिवाळी ही केवळ आनंदोत्सव नव्हती, तर ती जीवनशैलीचा अविभाज्य भाग होती. त्यात निसर्ग, श्रम, भक्ती आणि समाजभाव यांचा सुंदर संगम दिसून येत असे. 'दीपावली' या शब्दाचा अर्थ संस्कृतमधील 'दीप' म्हणजे दिवा आणि 'आवली' म्हणजे ओळ. म्हणजे दिव्यांची एक ओळ– दीपावली. इतिहास, पुराणे आणि ग्रंथांमध्ये या सणाचे विविध नावे आणि स्वरूप नोंदले आहे. जसे– यक्षरात्री, दीपमाला, दीपप्रतिपदुत्सव, दिवाळी, दीपिका, सुखरात्री, सुख सुप्तिका इत्यादी. पुराण, ज्योतिषशास्त्र आणि ऐतिहासिक ग्रंथांमध्ये या नावांचा उल्लेख आढळतो.

दिवाळीतील तिसरा दिवस लक्ष्मीपूजनाचा असतो. दिवाळीचा सर्वात तेजस्वी आणि मंगल दिवस. संध्याकाळी घराघरात दीपांच्या रांगा लागतात. मातीचे दिवे हे दिवाळीचे हृदय. चौथा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा किंवा पाडवा. या दिवशी राजा बळीच्या स्मरणार्थ लोक आनंदोत्सव साजरा करतात. 'इडा पीडा जावो, बळीचं राज्य येवो' असे म्हणत शुभेच्छा दिल्या जातात. दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज. भावंडांच्या प्रेमाचे प्रतीक.

जुन्या काळातील ग्रामीण समाजात या सणाचा आणखी एक भावनिक पैलू होता. लग्नानंतर सासरी गेलेली नवविवाहित मुलगी दिवाळीची आतुरतेने वाट पाहत असे. आपल्या भावाच्या पावलांची चाहूल लागली की तिच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू चमकत. भाऊ मोठ्या आपुलकीने बहिणीला माहेरी घेऊन येत असे. तिला साडी–चोळी, दागिने, भेटवस्तू देत असे. माहेरी आल्यावर ती आठ–पंधरा दिवस आई–वडिलांच्या कुशीत राहून आनंद लुटत असे. परत सासरी जाताना तिच्या डोळ्यांत पाणी असे, पण मनात भावाच्या प्रेमाचा प्रकाश झळकत असे. या सुंदर परंपरेत भावनांचे आणि संस्कारांचे जे चित्र दिसते, ते आजच्या पिढीने जपले पाहिजे.

पूर्वीच्या काळातील दिवाळी समाजातील एकोप्याचा आणि सामूहिक आनंदाचा उत्सव होती. शेर्जायांना गोडधोड पदार्थ देणे, एकत्र बसून दीपमाळा लावणे, गावात भजन–कीर्तन, हरिपाठ, लोकगीतं या सर्वांनी सामाजिक बांधिलकी मजबूत होत असे. गावातील चावडीवर दिवाळीच्या रात्री गप्पा, गोष्टी आणि हास्याचा गजर होत असे. लोक म्हणत, दिव्यांच्या प्रकाशात मन उजळावं. आज त्या ठिकाणी मोबाइलवरील शुभेच्छा संदेश आले आहेत, पण मानवी स्पर्श आणि आपलेपणा थोडा हरवला आहे. महाराष्ट्रात दिवाळीची खास पद्धत आहे–घराची साफसफाई, रांगोळी, आकाशकंदील, फराळ, फटाके, अभ्यंगस्नान, नवविवाहित दांपत्यासाठी ओवाळणी, घरगुती आणि सामाजिक कार्यक्रम या सर्वांवर भर दिला जातो. मुलांनी मातीचे किल्ले तयार करणे, प्रदर्शने आयोजित करणे ही परंपरा राज्यभर प्रचलित आहे. दिवाळी अंक हा सांस्कृतिक वारसा ठरला आहे, ज्यातून साहित्य, कला आणि मनोरंजनाची परंपरा जपली जाते. काळाच्या ओघात दिवाळीचे स्वरूप बदलले आहे. शहरीकरण, ग्लोबलायझेशन आणि उपभोक्तावादामुळे सणाचे बाह्यरूप अधिक भडक झाले आहे. रेडीमेड सजावट, इलेक्ट्रिक सीरियल लाइट्स, बाजारातून विकत घेतलेले पदार्थ, सोशल मीडियावरील शुभेच्छा आणि सेल्फी हे आजच्या काळाचे वास्तव आहे. फटाक्यांच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर परिणाम होत आहे. पण याच काळात पर्यावरणपूरक दिवाळीची चळवळही सुरू झाली आहे. मातीचे दिवे विकत घेऊन कारागिरांना मदत करणे, फटाक्यांऐवजी दिवे आणि फुलांनी सजावट करणे, प्लॅस्टिकमुक्त सण साजरा करणे. या चांगल्या गोष्टी नव्या युगाची सकारात्मक दिशा दाखवत आहेत.

खरं तर जुन्या आणि नव्या दिवाळीतला फरक बाह्य स्वरूपात आहे; सार्थकता मात्र तीच आहे. जुन्या काळातील साधेपणात आत्मिक समाधान होतं, तर आजच्या आधुनिकतेत सोयी आहेत. जर आपण त्या दोघांचा समतोल साधला, तर दिवाळी अधिक अर्थपूर्ण ठरू शकते. दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे अंतःकरणातील अंधार दूर करून मनात सत्य, प्रेम, करुणा आणि सद्भावनेचा प्रकाश पेटवणे.

आज आपण आधुनिक साधनांचा वापर करत असलो, तरी परंपरेचा दीप जिवंत ठेवणं गरजेचं आहे. मुलांना या सणाची उत्पत्ती, परंपरा आणि सांस्कृतिक मूल्ये समजावून सांगणं आवश्यक आहे. घराघरात मातीचे दिवे लावले गेले, रांगोळ्या काढल्या, गोडधोड वाटले गेले आणि सण एकत्र साजरा केला गेला, तर दिवाळी पुन्हा मनामनात उजळेल. दिवाळी हा केवळ सण नाही, तर संस्कृतीचा शाश्वत दीप आहे. आनंद, प्रकाश आणि संस्कारांचा तेजस्वी संगम आहे.

एकंदरीत, दिवाळी किंवा दीपावली हा प्रकाशाचा सण फक्त धार्मिक नसून सांस्कृतिक आणि सामाजिक उत्सव म्हणूनही प्राचीन काळापासून साजरा केला जातो. दिवाळीचा प्रकाश बाहेरच नव्हे, तर मनातही पेटायला हवा. जेव्हा आपण मनातील लोभ, मत्सर, अहंकार दूर करून ज्ञान, प्रेम, श्रद्धा आणि मैत्रीचा दीपप्रज्वलित करतो, तेव्हाच दिवाळीचा खरा अर्थ साकार होतो. अशा अंतःकरणी उजेडातच खरी शुभ दीपावली फुलते.

# फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण : आनंदीक्षणातून निसर्गविनाश

भारतीय समाज हा सण–उत्सवप्रिय समाज म्हणून जगात ओळखला जातो. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक सण हा आनंद, ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असतो. पण आधुनिक काळात या सणांच्या साजरीकरणात अनेक नव्या प्रथा समाविष्ट झाल्या आहेत, ज्यामुळे निसर्गाच्या आरोग्यावर आणि मानवी जीवनावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यातीलच एक म्हणजे फटाक्यांचा अतिरेकी वापर, ज्यामुळे निर्माण होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण आज आपल्या समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. दिवाळी, नाताळ, नवीन वर्ष, लग्नसोहळे, क्रिकेटमधील विजय किंवा राजकीय कार्यक्रम अशाप्रकारचा कोणताही प्रसंग असो, फटाक्यांच्या आवाजाशिवाय तो अपूर्ण वाटतो. परंतु या काही क्षणांच्या आनंदामागे दडलेले प्रदूषणाचे सत्य आपण वारंवार विसरतो.

फटाक्यांचे उत्पादन हे रासायनिक पदार्थांच्या जटिल मिश्रणावर आधारित असते. पोटॅशियम नायट्रेट, सल्फर, कोळशाची भुकटी, बॅरियम, मॅग्नेशियम, लीड, आर्सेनिक, ॲल्युमिनियम, स्ट्रॉन्शियम यांसारख्या अनेक धातू आणि रासायनिक घटकांचा वापर त्यात केला जातो. हे पदार्थ जळताना हवेमध्ये नायट्रोजन ऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म धूलिकण सोडतात. या प्रदूषक वायूंमुळे वातावरणातील हवा विषारी बनते. विशेषतः PM2.5 आणि PM10 या सूक्ष्मकणांचे प्रमाण फटाक्यांच्या दहनावेळी अनेक पट वाढते. (PM2.5 म्हणजे अतिशय बारीक, आणि PM10 म्हणजे थोडे मोठे कण) हे सूक्ष्मकण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये जाऊन रक्तप्रवाहात मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, ब्रॉन्कायटिस, फुफ्फुसाचे संक्रमण आणि हृदयविकारांची जोखीम वाढते.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतातील प्रमुख शहरांमध्ये दिवाळीनंतर हवेमधील प्रदूषणाची पातळी नेहमीपेक्षा चार ते पाच पट वाढते. दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळीच्या रात्रीनंतर PM2.5 च्या प्रमाणात अत्यंत झपाट्याने वाढ होते. दिल्लीमध्ये तर AQI (Air Quality Index) 'गंभीर' या श्रेणीत म्हणजे ४००–५०० पर्यंत पोहोचतो. ही परिस्थिती श्वसनास त्रास देणारी आणि जीवघेणी ठरू शकते. हवेमध्ये सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण वाढल्यामुळे डोळ्यांत जळजळ, घसा खवखवणे, डोकेदुखी, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे सामान्यपणे दिसून येतात.

फटाक्यांच्या दहनामुळे केवळ वायू प्रदूषणच नाही, तर ध्वनी प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढते. साधारण मानवी कानाला सुरक्षित ध्वनीमर्यादा ७५ डेसिबेल इतकी असते, परंतु फटाक्यांच्या स्फोटावेळी आवाजाची तीव्रता १२० ते १५० डेसिबेलपर्यंत पोहोचते. अशा तीव्र आवाजामुळे कानातील श्रवणशक्तीवर परिणाम होतो, झोपेच्या गुणवत्तेत घट येते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक ताण निर्माण होतो. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी हा आवाज विशेषतः त्रासदायक असतो. पक्षी, प्राणी यांनाही ध्वनी प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. अनेक पक्षी दिशाभूल होऊन झाडांवरून पडतात, पाळीव प्राण्यांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वन्यजीवांमध्ये प्रजननाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो.

फटाक्यांचा परिणाम फक्त हवेमध्येच मर्यादित राहत नाही. त्यांचे अवशेष म्हणजे कागदाचे तुकडे, धातूंचे कण, प्लास्टिकचे कवच आणि राख जमिनीवर साचतात. हे सर्व नाल्यांत, पाण्याच्या स्त्रोतांत आणि शेतीच्या जमिनीत मिसळून जमिनीचे आणि जलस्त्रोतांचे प्रदूषण निर्माण करतात. जड धातूंचे हे अवशेष जमिनीतील पोषक घटकांची हानी करतात, त्यामुळे पीक उत्पादनावरही परिणाम होतो. नद्या आणि तलावांमध्ये मिसळलेले हे रसायन जलीय जीवसृष्टीसाठी घातक ठरते.

फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो सामाजिक आणि आर्थिक प्रश्नही आहे. दरवर्षी फटाके फोडताना शेकडो अपघात होतात. मुलांच्या आणि तरुणांच्या हातांना, चेहऱ्यांना व डोळ्यांना गंभीर दुखापती होतात. अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्व येते. या दुर्घटनांमुळे रुग्णालयांवरील भार वाढतो आणि कुटुंबांवर मानसिक तसेच आर्थिक ओझे येते. प्रदूषणामुळे वाढणाऱ्या आजारांमुळे आरोग्यखर्च वाढतो, कामकाजातील उत्पादकता कमी होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो.

भारतामध्ये 'वायू प्रदूषण प्रतिबंधक कायदा, १९८१', 'पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६' आणि 'ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २०००' यांद्वारे फटाक्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही दिवाळीच्या काळात केवळ 'ग्रीन फटाके' वापरण्याची शिफारस केली आहे. हे ग्रीन फटाके पारंपरिक फटाक्यांपेक्षा सुमारे ३० टक्के कमी प्रदूषण निर्माण करतात. तसेच रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तथापि, या नियमांचे पालन नागरिकांनी मनापासून केले नाही, तर कायदे कागदावरच राहतील.

यावर उपाय म्हणून जनजागृती आणि जबाबदार वर्तन अत्यंत आवश्यक आहे. सण साजरे करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, पण सण साजरा करताना निसर्गाचा अपमान न करता, पर्यावरणपूरक पद्धती अवलंबणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपण सणाचा आनंद फटाक्यांशिवायही साजरा करू शकतो. पारंपरिक दिवे, एलईडी लाइट्स, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण रक्षणाचे संकल्प यांद्वारे. शाळा–कॉलेजांतून विद्यार्थ्यांना फटाक्यांच्या दुष्परिणामांबद्दल शिक्षित केले पाहिजे. माध्यमांनीही याबाबत जबाबदार भूमिका घेत जनतेला जागरूक करणे आवश्यक आहे.

आजचा काळ हा हवामान बदलाचा आणि पर्यावरणीय संकटांचा काळ आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे, पर्जन्यमानात अनिश्चितता वाढली आहे, आणि शुद्ध हवा हे आता लक्झरीसारखे झाले आहे. अशा वेळी काही क्षणांचा आनंद मिळवण्यासाठी आपण आपल्या भविष्याच्या श्वासावर संकट आणू शकत नाही. प्रत्येक नागरिकाने प्रदूषणमुक्त सण साजरा करण्याचा संकल्प केल्यास ही समस्या निश्चितच कमी होईल.

फटाक्यांचा आवाज काही क्षणासाठी आकाश उजळवतो, पण त्याच धुराने आपल्या जीवनाचा प्रकाश मंदावतो. निसर्गाचा आवाज ऐका तो आपल्याला सांगतो की 'आनंद करा, पण जबाबदारीने.' सण साजरा करा, पण प्रदूषण नको. प्रकाश पसरवा, पण निसर्गाच्या श्वासाच्या किंमतीवर नाही.

खरी दिवाळी, खरा आनंद, खरा प्रकाश तोच जो निसर्ग, समाज आणि मानव यांच्या समन्वयातून जन्मतो. चला, या सणासुदीला आपण सर्वांनी मिळून ठरवूया की 'फटाके नाही, फुलझड्यांऐवजी फुलांची सजावट, धूर नाही तर स्वच्छ हवा, आवाज नाही तर आनंदाचा गजर.' कारण सणाचा खरा अर्थ आहे प्रकाशाचा उत्सव आणि तो प्रकाश पर्यावरणपूरक, स्वच्छ आणि शाश्वत असेल, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने उज्ज्वल ठरेल.



– डॉ. राजेंद्र बगाटे,
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. 9960103582
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# उजळती ज्योती । स्वातंत्र्याच्या

दीपांनी दिपल्या दिशा! सण असे हा, आज दीपावली। हर्षाने दुनिया प्रकाशित दिसे, आतून बाहेरूनी । अंगा चर्चुनि अत्तरे, भरजरी वस्त्रास लेवूनिया। चंद्रज्योती फटाकडे उडविती, आबाल सारे जन ॥ असा दिवाळीचा धुमधडाका, झगमगाट, घमघमाट आणि थाटमाट शब्दांत बांधणाऱ्या समाजनिष्ठ कवी अनंत काणेकरांचं मन मात्र अस्वस्थ होतं. दिवाळीच्या आनंदाचा आस्वाद ते घेऊ शकत नव्हतं. कारण ते मानवतावादी होते. म्हणूनच त्यांना दिसला, ऐन दिवाळीच्या दिवशी सार्वजनिक हौदावर आंघोळ करणारा कुणी एक बापडा. कवीच्या दृष्टीपुढील दीपोत्सव क्षणात अदृश्य झाला आणि त्या जागी उरली काळीकुट्टं भकास अमावास्या! आपल्या खिन्नतेचं वर्णन करताना शेवटी काणेकर म्हणतात, तो हासे परी महदी, भडभडे चित्ता जडे खिन्नता। नाचो आणिक बागडो जग, नसे माझ्या जिवा शांतता॥ स्वतःचा आनंद परदुःखावरून ओवाळून टाकणारे थोर मनाचे कविवर्य काणेकर मराठी साहित्याची उंची वाढवून गेले आहेत.

जनजीवनाचा उथळ प्रवाह मात्र इतका गंभीर कधीच नसतो. ह्या उथळ पाण्याचा खळखळाट गणेशोत्सवात सुरू होतो, नवरात्रात वाढतो आणि दिवाळीत उताला येतो. कालचक्र उलटं फिरवून शे–दोनशे वर्षांपूर्वीच्या दिवाळीचं दर्शन घ्यायचं म्हटलं, तर मात्र कविवर्य काणेकरांइतकंच दुःख आपणालाही होईल. राजवाड्यावर, जमीनदारांच्या गढीवर, पाटील–कुलकर्ण्यांच्या वाड्यावर दिवाळी असायची; आणि रयतेच्या घरी असायचा अक्षरशः दिवाळसण! रावा घरी दिवाळी, तर रंका घरी दिवाळं निघायचं. आज राष्ट्रस्थितीत थोडा बदल झाला आहे. भूतकाळी महापुरुषांनी जिवाचं रान करून अनेक घरं प्रकाशाने उजळून टाकलीत. पण अजूनही अनेक घरांत ठाण मांडून बसलेला अंधार तेथून हालायला तयार नाही. अनेक दुर्दैवी जीव आजही सार्वजनिक हौदावरच आंघोळ करीत असताना दिसतात.

वास्तव असं कितीही विद्रूप असलं तरी घराघरांतून, झोपडीझोपडींतून इडापीडा टळो आणि बळीचं राज्य येवो, असे माताभगिनींचे आश्वासक शब्द न चुकता कानांवर पडतात. मानवतावादी बळीराजाचं हे स्मरण चिरस्थायी झालं आहे. जनसामान्यांना भट भिक्षुक– पंडित–शास्त्रीशाहीच्या अमानुष जोखडातून मुक्त करण्यासाठी स्वतःचं बलिदान करणारा बळीराजा हा पहिला महात्मा! कृतज्ञ मनाने बळीराजाचं केलं जाणारं स्मरण हा एक प्रकारे कपटी, दुष्ट वामनाचा सार्वत्रिक धिक्कारच आहे!

मानवतावादाच्या रक्षणासाठी बळीराजाचा संप्रदाय चालवला तेजस्वी रघुवीरबंधू लक्ष्मणाने. नीच परशुरामाच्या बेछूट, जातीयवादी हत्याकांडाला रोखलं, पराक्रमी लक्ष्मणाने! अन्यायाचा अंधार पसरवणाऱ्या परशुरामाला तळकोकण गाठून अज्ञातवासात जावं लागलं. लक्ष्मण हा लोकनायक झाला. दिन दिन दिवाळी । गाई म्हशी ओवाळी। गाई म्हशी कुणाच्या । लक्ष्मणाच्या– हे आहे लक्ष्मणाचं पुण्यस्मरण ! दीपावलीचं पर्व पांडवपंचमीने संपतं. पांडवांचा नायक श्रीकृष्ण, त्याचा बालमित्र पेंद्या. नरक चतुर्दशी ते पांडवपंचमी हे सात दिवस लोकनायक, इंद्रजीत श्रीकृष्णाच्या स्मरणाचे. देवाधिपती इंद्राला सळो की पळो करून सोडणारा, गुराख्यांनाही प्रतिष्ठा मिळवून देणारा, वर्णवर्चस्ववादी अहंकाराची नांगी मोडून आपणापुढे त्यांना नतमस्तक व्हायला लावणारा महान समाजपुरुष म्हणजे श्रीकृष्ण! अर्थात, ह्या साऱ्या पुराणकथा. पण वास्तव त्यापेक्षा भिन्न नसल्याने त्या लोकांनी संस्कृतीची भली– बुरी साक्ष देण्यासाठी जपल्या गेल्या आहेत.

त्यातूनच बळीराजाच्या नव्या रूपात निर्माण झाले – छत्रपती शिवराय! अहंमन्य स्वधर्मी आणि क्रूर परधर्मियांचा निःपात करणारा कुळवाडी कुलभूषण! शिवरायांनी शेतकऱ्यांच्या हाती तलवारदिली, तर पुढील काळात महात्मा जोतिरावांनी त्यांच्या हाती विद्येचं सामर्थ्य सोपवलं. जोतिरावांच्या ज्योतीवर छत्रपती शाहूंनी समतेचे दीप उजळले. डॉ. आंबेडकरांनी गावकुसाबाहेर प्रकाश नेला. राहिलेला अंधार नाहीसा करणं अवघड आहे, पण अशक्य नाही. हे काम भरपूर आहे. पण ते करणं आवश्यकही आहे. हा दीपोत्सव त्यासाठीची लखलखती प्रेरणा सर्वांना देवो!

समतेचा दीप। लावी बळीराजा
नमस्कार माझा । महात्म्यास ॥१
सुमित्रेचा पुत्र । लक्ष्मण वीर
ज्ञातिअहंकार । करी नष्ट ॥२
श्रीकृष्णाने केले। इंद्रा पराभूत
देवावरी मात। माणसाची ॥३
ज्ञानदीप लावी । थोर जोतिराव
रंका केले राव। ज्ञानबळे ४
राबविता सत्ता । जनकल्याणार्थ
जाहले कृतार्थ । शाहूराजे ॥५
गुलामीचे तम। गांधीजी हटविती
उजळती ज्योती। स्वातंत्र्याच्या ॥ ६
दीपोत्सव नित्य । येथे होतो तरी
अंधार पसरी । हातपाय ॥७
पेटवा पणत्या । प्राणांच्याच आता
स्थापावया सत्ता। प्रकाशाची ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# मतदार यादीतील बोगसगिरीचा भांडाफोड

## 'घर क्रमांक १' मधील १८८ बोगस मतदारांवरून रोहित पवारांचा स्फोटक आरोप



'दिवाळीचा आनंद साजरा करण्यासाठी नव्हे, तर अधिकाधिक मतदारांना जागृत करण्यासाठी आज फटाके फोडले. बोगस मतदार तयार करून लोकशाहीची हत्या केली जात आहे,' – **आ. रोहित पवार**

**पुणे (कटूसत्य वृत्त) :-** शिरूर विधानसभा मतदारसंघातील केसनंद गावातील 'घर क्रमांक १' या ठिकाणी एकाच पत्त्यावर तब्बल १८८ बोगस मतदारांची नोंद असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी या प्रकाराचा प्रतिकात्मक निषेध करत 'फटाके फोडून' दिवाळी साजरी केली. त्यांच्या सोशल मीडियावरील या पोस्टने सध्या राज्यात खळबळ माजवली आहे.

**एकाच घरात १८८ मतदार?**

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात असलेल्या केसनंद गावात घर क्रमांक या पत्त्यावर विविध राज्यांतील, सर्व जाती–धमार्तील १८८ मतदार असल्याची नोंद मतदार यादीत आढळून आली. वास्तविक पाहता तेथील स्थानिक ग्रामपंचायत आणि नागरिकांनी अशा कोणत्याही घराच्या अस्तित्वाचा आणि मतदारांचा इन्कार केला आहे.

आ. अशोकबापू पवार यांच्यासह रोहित पवार आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी या बोगस नोंदीविरोधात 'फटाके फोडून' दिवाळी साजरी केली. मात्र ही आनंदाची नाही, तर लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेली जागृती होती, असं पवारांनी स्पष्ट केलं.

आ. पवार यांनी आरोप केला की, 'बोगस मतदारांच्या माध्यमातून ४०० पेक्षा अधिक खासदार निवडून आणून संविधान, आरक्षण आणि लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. देशभरात अशी मतदार नोंदणी झाली असून हे आता लपून राहिलेलं नाही.'

या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया देताना पवार म्हणाले की, 'ही लोकशाहीची हत्या आहे. म्हणूनच महाविकास आघाडी रस्त्यावर उतरली आहे. लोकशाही वाचवण्यासाठी आता प्रत्येक नागरिकाने पुढे यायला हवं. आपण सर्वजण मिळून या बोगसगिरीला चाप लावू.'

आ. रोहित पवार यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. त्यांच्या सोशल मीडियावरील पोस्टवर प्रचंड प्रतिक्रिया उमटत असून, अनेकांनी निवडणूक आयोगाकडून तातडीने चौकशीची मागणी केली आहे.

निरामय पॅरालिसिस सेंटर
ISO 9001:2015
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापूर

# माढा तालुक्यातील अतिवृष्टी व पूरग्रस्त बाधित शेतकऱ्यांसाठी 131.75 कोटी रुपये मिळणार

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील 118 गावांमधील बाधित शेतकऱ्यांना जवळपास 131.75 कोटी रुपये वितरित होणार अशी माहिती मंडळ कृषी अधिकारी टेंभुर्णी संजय पाटील यांनी दिली यावर्षी माढा तालुक्यातील सर्व मंडळ मध्ये सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शिना कार्डच्या गावात पुराच्या पाण्याने अक्षरशा थैमान घातला गेला त्यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे शेती पिकांचं व इतर मालमत्तेचे नुकसान झालेलं आहे त्याचबरोबर तालुक्यातील जवळपास 118 गावातील सर्व शेतकऱ्यांच्या झालेल्या पिकाच्या नुकसानीचे पंचनामे शासनाच्या कृषी महसूल व ग्रामविकास विभागाच्या ग्रामस्तरीय समितीने करून जवळपास 98 हजार 328 शेतकरी संख्या यांचे 81 हजार 073 हेक्टर बाधित क्षेत्राची पंचनामे करून 131.75 कोटी नुकसानीचा पंचनामे करून शेतकऱ्यांच्या याद्या अंतिम करून त्या शासनाच्या



आदेशानुसार ऑनलाइन अपलोड करण्यात आलेले आहेत व त्या पंचनामाच्या आधारे तालुक्यातील 118 गावातील 98 हजार 328 शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये शासनाच्या निकषाप्रमाणे जवळपास 131.75 कोटी निधी वितरण सुरुवात झालेली आहे दिवाळी व सुट्टीच्या दिवसांची सुट्टी न घेता प्रशासनाच्या कृषी महसूल व ग्रामविकास प्रशासनाने अहोरात्र पंचनामे करून शेतकऱ्यांच्या याद्या अंतिम करून अपलोड केल्याने शेतकऱ्याच्या बँक खात्यावर पैसे जमा होण्यास सुरुवात झाल्याने पात्र शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केला.

पान १ वरून

# कलंकित भ्रष्टाचारी दिलीप मानेला ...

मानेंच्या पक्ष प्रवेशामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यात आमदार सुभाष देशमुख यांना जड जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रवेश करणाऱ्या नेत्यांनी भाजपा कार्यकर्त्यांवर मोठा अन्याय केला आहे, आता आम्ही त्यांच्याच दावणीला बांधले जाणार नाही अशी संतप्त प्रतिक्रिया भाजप कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले आहे.

तर भाजपा आमदार सुभाष देशमुख म्हणाले, भारतीय जनता पक्ष देशात, राज्यात वाढला पाहिजे, या भूमिकेचा मी आहे. पण हे सर्व करत असताना एकमेकांना विश्वासात घेणे गरजेचं असतं. जे नवीन लोकं पक्षात येणार आहे, त्यांनी किमान तीन–चार वर्षे तरी पक्षाचे काम करावे. त्यानंतर पक्षाने त्यांना भूमिका द्यावी. हे पक्षप्रवेश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर लक्ष ठेवून प्रवेश करत असल्याचंही देशमुख यांनी सांगितलं.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जर भाजप जास्तीत जास्त जागा निवडून आल्या, त्यातून एक मोठा गट तयार होईल. प्रवेश करणारे जर त्यावेळेस एक झाले तर त्यावेळेस जिल्हा परिषदचा अध्यक्ष भाजपचा होत असताना हा गट तो अध्यक्ष होऊन देतील का नाही अशी शंकाही आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केली.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सहकार महर्षी साखर कारखान्याचा ऊस गळीत हंगाम शुभारंभ संपन्न

अकलूज (कटूसत्य वृत्त):- शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५-२६ चा ६४ वा ऊस गळीत हंगाम शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील,संचालिका कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील व प्रमुख मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न झाला.



यावेळी विधीवत काटा व मोळी पूजन व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख,विश्वतेजसिंह मोहिते-पाटील,चि.सयाजीराजे मोहिते-पाटील व माजी व्हाईस चेअरमन सुरेश मेहेर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच सकाळी डिस्टीलरी व ॲसेटीक ॲसिड प्रकल्पाचा उत्पादन शुभारंभ ही पार पडला.श्री.सत्यनारायण महापूजा कारखाना संचालक महादेव क्षीरसागर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.नंदा क्षीरसागर या उभयतांच्या शुभहस्ते संपन्न झाली.

या गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी सहकार महर्षी कै.शंकरराव मोहिते-पाटील व कै.आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.यावेळी झालेल्या कार्यक्रमांमध्ये सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, राज्यातील सन २०२५-२५ च्या गळीत हंगामाचा आढावा घेऊन गतवर्षी कारखाने कमी दिवस चालले त्यामुळे सर्वच कारखान्यांचे गाळप व साखर उत्पादन कमी झाले याचा सर्व कारखान्यांवरती आर्थिक परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. शासनाने साखर निर्यात,ईथेनॉल वापर, साखर विक्री (एम.एस.पी.) बाबत दिर्घकालीन धोरण ठरवून साखर उद्योगाला दिलासा देणे अत्यंत गरजेचे आहे.तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी निरा उजवा कालव्या लगत समांतर पाईपलाईन योजना शासनाने करणे गरजेचे आहे.तसेच खाजगी कारखान्याचा सहकारी कारखान्यावर झालेला परिणाम याबाबत त्यांनी माहिती दिली. सहकार महर्षी कारखान्याने सन २०२४-२५ मधील गाळपास आलेल्या ऊसाला दिपावली सणाकरिता दिलेल्या प्रति मे.टन १००/- रुपये पेमेंटसह एकूण प्रति मे.टन रक्कम रु.३,०००/- ऊस दर दिला तसेच सभासदांना शेती विषयक सुविधा,साखर,अपघात विमा व इतर सेवा सुविधा देऊन सहकार महर्षीची परंपरा कायम ठेवली आहे तसेच कर्मचारी यांना पगार,बोनस शिवाय वेतनवाढ व ऑक्टोबर २०२५ पासून १० % फरक वेतनवाढ ही लागू केलेली आहे.

त्याबरोबर इतर सेवा-सुविधाही प्रदान केलेल्या आहेत तसेच ऊस तोडणी कंत्राटदार यांची गत हंगामातील तोडणी व वाहतुकीची बिले तसेच कमिशन व डिपॉझिटची संपूर्ण रक्कम वेळचे वेळी जमा केलेली आहे. कारखाना स्थापनेपासून कारखान्याचा वजन काटा हा अचूक व विश्वासात पात्र आहे.तसेच कारखान्याने नवीन सीबीजी कॉम्प्रेसर बायोगॅस व सोलर वीज निर्मिती सारखे प्रकल्प हाती घेतले आहेत.ऊसाचे संगोपन व उत्पादन याबाबतचे सभासदांसाठी ए.आय.कृत्रिम बुद्धिमत्ता सारखे तंत्रज्ञान योजना कारखाना राबवत आहे.त्यामध्ये जास्तीत जास्त सभासदांनी सहभाग नोंदवावा. कारखाना कार्यक्षेत्रातील काही भागांमध्ये अतिवृष्टीमुळे ऊसाचे नुकसान झाले आहे परंतु गतवर्षीपेक्षा ऊसाची उपलब्धता चांगली होणार आहे यामुळे हंगाम जादा दिवस चालणार असून साधारणतः ११ लाख मे.टन ऊस गाळप आपल्या कारखान्यास अपेक्षित आहे.ऊस गाळपासाठी कारखाना ऑफ सिझन मधील मशिनरी व इतर सर्व कामे पूर्ण झाली असून दैनंदिन गाळपासाठी आवश्यक असणारी सर्व तोडणी वाहतूक यंत्रणा कारखाना स्थळावर व कार्यक्षेत्रात दाखल झालेली आहे. ऊस उत्पादकांनी आपला पिकवलेला सर्व ऊस या कारखान्यास देऊन विश्वासाचे नाते अधिकाधिक दृढ करून सहकार्य करावे असे आवाहन केले.यावेळी कारखान्याचे तज्ञ संचालक व माजी व्हॉईस चेअरमन ॲड.प्रकाशराव व्यंकटराव पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी केले.या कार्यक्रमास संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार,रावसाहेब मगर, संग्रामसिंह जहागिरदार, रामचंद्र सिद,रावसाहेब पराडे, अमरदीप काळकुटे, गोविंद पवार,सुभाष कटके, जयदीप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, संचालिका सुजाता शिंदे, तज्ञ संचालक रामचंद्रराव सावंत-पाटील, कार्यलक्षी संचालक रणजीत रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टीमेडिया लेजर शो कमिटी सदस्य पांडुरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, विनायक केचे,दत्तात्रय चव्हाण, राजेंद्र भोसले, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, श्रीकांत बोडके सौ.हर्षाली निंबाळकर माजी संचालक दत्तात्रय शिर्के,भिमराव काळे,सुभाष पताळे, भारत फुले, मोहनराव लोंढे, महादेवराव घाडगे, सुनील एकतपुरे, केशव ताटे-देशमुख, राजेंद्र मोहिते, विजयराव हेगडे, सभासद बंधू, खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पटवर्धनकुरोली शेतकरीच प्रशासन विरोध बोंबाबोंब आंदोलन करणार

**पटवर्धन कुरोली (कटूसत्य वृत्त):-** पटवर्धन कुरोली येथे गेले काही दिवसांपासून तलाठी पुर्णवेळ उपलब्ध नसल्याने या गावातील अतिवृष्टी चे नुकसान भरपाईचे कामकाज अतीशय धिम्या गतीने चालू आहे. मागील काही दिवसांपूर्वी पटवर्धन कुरोली येथेल तलाठी भाऊसाहेबांची बदली झाली. नवीन कर्मचारी कामावर रुजू झाले. परंतु लगेच रजेवर गेले. यानंतर दुसऱ्या कर्मच्याकडे पद भार देण्यात आला.



याच दरम्यान अतिवृष्टी चे पंचनामे चालू झाले. पहील्या कर्मचारी रजेवर गेल्याने दुसऱ्या कर्मचारी याच्या मध्ये चार्ज घेण्यादेण्यावरुन तात्पुरता वाद झाल्याने गेल्या पंधरा ते वीस दिवसांत तलाठी कार्यालयात जबाबदार कर्मचारी उपलब्ध नाही. सर्कल मॉडम व मदतनीस यांनी अतिवृष्टी चे कामकाज पुर्ण करत आहेत. परंतु सह्या करणारा ज्याच्याकडे पदभार आहे, तो रजेवर गेलेला कर्मचारी हे दोन्ही कर्मचारी हजर तर नाहीतच पण फोनही उचलत नाहीत. त्यामुळे पटवर्धन कुरोली येथील अतिवृष्टी,शाळेचे दाखले, बॉंकेचे कामकाज, उत्पन्नाचे दाखले, कामकाज,पुर्णपणे बंद आहे पुढील दोनच दिवसात योग्य त्या कर्मचार्याची उपलब्धता झाली नाही तर पटवर्धन कुरोली येथील ग्रामस्था सह स्वाभिमानी शेतकरी संघटना, बळीराजा शेतकरी संघटना, तंटामुक्त समीती, सर्वांचे वतीने शासनाच्या गलथान कारभाराला जाग आणण्यासाठी बोंबाबोंब अंदोलन करण्यात येईल. याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन राहील.

यावेळी बळीराजा शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली जवळेकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कांतीलाल नाईकनवरे, शेतकरी नामदेव खेडकर,सुनील नाईकनवरे, पोपट टेके, बाळासाहेब शेख उपस्थित होते.

# देशविरोधी कृत्य करणाऱ्या RSS वर कायमस्वरूपी बंदी घाला - कांबळे यांची तीव्र मागणी

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) या संघटनेवर देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप करत, त्या संघटनेवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी भीम आर्मी संविधान रक्षक दलाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी केली आहे.

करमाळ्यात माध्यमांशी बोलताना कांबळे म्हणाले की, 'महात्मा गांधींच्या हत्येत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सहभाग होता. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात संघाचे योगदान शून्य आहे. उलट देशात जातीय आणि धार्मिक द्वेषाचे वातावरण निर्माण करण्याचे काम या संघटनेने केले आहे,' असे त्यांनी ठामपणे सांगितले.



ते पुढे म्हणाले की, 'संघाचे स्वयंसेवक वारंवार देशाच्या संविधानाचा आणि राष्ट्रध्वजाचा अवमान करत आले आहेत. गोहत्येच्या नावाखाली सर्वसामान्य शेतकरी आणि शेतमजुरांवर अत्याचार केले जात आहेत. महाराष्ट्रातील मालेगाव, पूर्णा, नांदेड, परभणी आदी ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटांमध्येही संघाशी संबंधित व्यक्तींवर गुन्हे दाखल आहेत.'

कांबळे यांनी आरोप केला की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे धर्मादाय विभागाकडे नोंदणीच नाही, त्यामुळे संघाकडे बेहिशोबी मालमत्ता साठवलेली आहे. याशिवाय, 'संघाचे काही स्वयंसेवक पाकिस्तानला गुप्त माहिती पुरवत असल्याचे प्रदीप कुरुळकर प्रकरणातून स्पष्ट झाले आहे,' असा गंभीर आरोप त्यांनी केला.

इतकेच नव्हे तर कांबळे यांनी ऐतिहासिक संदर्भ देत सांगितले की, 'देशविघातक कृत्यांमुळेच 1947, 1948, 1975 आणि 1992 या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्यात आली होती. आता पुन्हा तीच वेळ आली आहे. त्यामुळे संघावर तातडीने आणि कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी,'अशी मागणी त्यांनी जोरदार शब्दांत केली.

# महापूर व्यवस्थापनाचा होणार विशेष कृती आराखडा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात कधी नव्हे तो महापूर आला. सीना नदीकाठच्या रहिवाशांसह आम्हालाही महापुराचे संकट नवीन होते. अतिवृष्टी व महापुराच्या नैसर्गिक आपत्तीत कसे काम करावे, याची माहिती व्हावी यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



सोलापूर श्रमिक पत्रकार संघात झालेल्या वातार्लापमध्ये ते बोलत होते. यावेळी संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, महापुरात अडकलेल्या ४ हजार ५३१ जणांना वाचविण्यासाठी एनडीआरएफ, आर्मी, कोल्हापूर, सांगली येथील पथकांची मदत झाली. पूरग्रस्त गावांत चाऱ्याची तीव्र टंचाई भासत असल्याने कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, सांगली येथील मोठ्या चारा पुरवठादारांकडून जनावरांसाठी चारा उपलब्ध केला.

भविष्यातील महापुराचे संकट टाळण्यासाठी सीना कोळेगाव धरणाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. सीना व सीनेला मिळणाऱ्या उपनद्यांवरील बंधाऱ्यांची उंचीही वाढविणे आवश्यक आहे.

आपत्तीमध्ये काम करण्याच्या काही पद्धती असतात. त्यानुसार मी महापुराच्या पहिल्या टप्प्यात २१ ते २४ सप्टेंबर दरम्यान कार्यालयात बसून बचाव कायार्ला प्राधान्य दिले. त्यामुळे कोणतीही जीवितहानी न होता, वेळेत सर्वांना सुखरूप बाहेर काढता आले. त्यानंतर मी मदत कायार्ला प्राधान्य दिले.

बाधितांना जेवण, जीवनावश्यक वस्तू, पूरग्रस्त गावांतील पशुधनाला चारा व्यवस्थित पुरविण्यात आला. नंतरच्या टप्प्यात पंचनामे व नुकसानीची माहिती शासनाला पाठवून बाधितांना शासनाची मदत मिळवून देण्यासाठी आम्ही काम केल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

बोइंग, नाईट लँडिंगसाठी अतिक्रमणांचा अडथळा सोलापूरच्या विमानतळावर भविष्यात बोइंग विमानही उतरविण्याचे आमचे नियोजन आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच जाहीर केले आहे. हे सांगत असताना त्यांनी सोलापूरकरांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

नाईट लँडिंग व बोइंग विमानाच्या पार्श्वभूमीवर बोलताना जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, सोलापूरच्या विमानतळावर बोइंग विमान उतरविण्यासाठी सध्या असलेल्या धावपट्टीत वाढ करण्याची गरज आहे.धावपट्टी वाढविण्यासाठी व नाईट लँडिंगची सुविधा करण्यासाठी विमानतळ परिसरातील अतिक्रमणे हटवावी लागणार आहेत. अतिक्रमणासंदभार्तील अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. याबाबतची माहिती आपण मुख्यमंत्र्यांना दिली असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

# कल्याण नगर येथील अतिवृष्टी बाधित कुटुंबांचे तात्काळ पंचनामे करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुळे सोलापूर भागातील कल्याण नगर भाग एक व दोन येथील सुमारे 25 ते 30 कुटुंब अतिवृष्टीमुळे बाधित असून संसार उपयोगी साहित्यचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले कारणाने त्या बाधित कुटुंबाची त्वरित पंचनामे करून त्यांना शासकीय मदत मिळवून द्यावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम यांनी दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे जणता दरबारात निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



जुळे सोलापूर भागातील कल्याण नगर हा परिसर सखल भागात येत असल्याकारणाने गेल्या दहा वर्षापासून कल्याण नगर मधील सुमारे 25 ते 30 घरांमध्ये दरवर्षी पावसाचे पाणी शिरून संसार उपयोगी साहित्याचे नुकसान होऊन आर्थिक नुकसान होत आहे यावर्षी अतिवृष्टीमुळे मोठा पाऊस पडल्याने कल्याण नगर मधील सुमारे 25 ते 30 नागरिकांच्या घरांमध्ये पावसाची पाणी शिरून प्रचंड नुकसान झाले याकडे दक्षिण सोलापूर तहसीलदार प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांनी दुर्लक्ष केल्यामुळे या बाधित कुटुंबाचे पंचनामे करण्यात आले नाही त्यामुळे शासकीय मदतीपासून या कुटुंबांना वंचित राहावे लागणार आहे त्यामुळे या भागातील बाधित कुटुंबीयच्या घराचे पंचनामे करून त्यांना शासकीय मदत मिळवून द्यावी व दरवर्षी भेडसवणारी ही समस्या कायमस्वरूपी दूर करण्यात यावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली.

त्याचबरोबर जुळे सोलापूरला जोडणारा आसरा चौक ते विजापूर रोड हा मार्ग सध्या अत्यंत अरुंद असून रस्त्याच्या कडेला अतिक्रमण ही मोठ्या प्रमाणात वाढले आहे या भागांमध्ये फार मोठ्या अनेक नागरी वसाहती निर्माण होऊन लोकसंख्या ही प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे त्यामुळे हा मुख्य रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ वाढून अनेक वेळा वाहतुकीची कोंडी सुद्धा वारंवार होत आहे त्यामुळे आसरा चौक ते विजापूर रोड हा रस्ता चौपदरी मॉडेल रस्ता म्हणून विकसित करण्यात यावा अशी ही मागणी संभाजी ब्रिगेडचे वतीने करण्यात आली आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम अरविंद शेळके गजानन शिंदे इस्माईल मकानदार बालाजी वाघे आधी उपस्थित होते.

# पंढरीत नगरपरिषद निवडणुकीसाठी आ. अवताडे समर्थकांची बैठक

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आ. समाधान आवताडे हे पंढरपूर मंगळवेढ्याचे आ. झाल्यापासून , त्यांच्या समर्थकांच्या संख्येत वाढ झाली आहे. आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे समर्थक रविवारी एकत्र आले.



पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीत उडी घेण्याचा विचार या समर्थकांनी बोलून दाखवला.

आ. अवताडे समर्थकांच्या या बैठकीने पंढरपूर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

आ. समाधान आवताडे यांचे अनेक समर्थक नगरसेवक पदाच्या पात्रतेचे आहेत.

यापूवीर्ही त्यांनी अनेक नगरपरिषद निवडणुका लढवल्या आहेत. अवताडे आ.झाल्यापासून त्यांच्या समर्थकांच्या संख्येत तितकीच वाढ झाली आहे. या समर्थकांच्या भावनेचा आ. अवताडे यांनी विचार करावा. या निवडणुकीत आपणास संधी मिळावी , अशी भूमिका अनेक समर्थकांनी व्यक्त केली.

पंढरपूर नगर परिषदेवर परिचारक गटाची एकहाती सत्ता आहे. यातच परिचारक हेही भाजपा पक्षातच आहेत. यामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकीत, आमदार अवताडे समर्थकांना किती न्याय मिळणार ? हा प्रश्न उपस्थित होत असतानाच, आमदार अवताडे समर्थकांनी येथील शासकीय विश्रामगृहात घेतलेली स्वतंत्र बैठक, पंढरपूरच्या राजकारणात मोठा चचेर्चा विषय ठरली आहे. अवताडे समर्थकांना पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीत, सामावून घेणे परिचारकांना क्रमप्राप्त आहे.

परंतु परिचारकांनी डावलले तरीही , ही निवडणूक कोणत्याही परिस्थितीत लढवायचीच , अशी आग्रही भूमिका या समर्थकांनी घेतली. आ. अवताडे समर्थकांची ही बैठक पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीत कोणता करिश्मा साधणार याकडे, सबंध तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहावर झालेल्या या बैठकीस सुनील डोंबे, शेखर भोसले, संतोष डोंगरे, भैय्या कळसे, वैभव फिसलकर, लखन चौगुले, समाजसेवक संजय बाबा ननवरे, शंकर सुरवसे यांच्यासह अवताडे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# शिष्यवृत्ती परीक्षेत पुन्हा बदल!

## पुढील वर्षापासून चौथी, सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर इयत्ता पाचवीऐवजी इयत्ता चौथी आणि इयत्ता आठवीऐवजी इयत्ता सातवीमध्ये करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या परीक्षेतील बदलाची अंमलबजावणी २०२५-२६ शैक्षणिक सत्रापासून करण्यात येणार आहे.

इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन साधारणतः फेब्रुवारी २०२६च्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या रविवारी करण्यात येईल.


तर इयत्ता चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन एप्रिल किंवा मे २०२६च्या एका रविवारी करण्यात येईल. इयत्ता चौथीसाठी प्रतिवर्षी पाच हजार रुपये तर इयत्ता सातवीसाठी प्रतिवर्षी सात हजार ५०० रुपये शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

चौथी व पाचवीकरिता १६,६९३ आणि इयत्ता सातवी आणि आठवीकरिता प्रत्येकी १६,५८८ शिष्यवृत्ती संच मंजूर राहतील. त्याचप्रमाणे दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षांचे नाव 'प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा' आणि 'उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा' असे करण्यात येणार आहे. शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर बदलानंतर एकूण प्रविष्ट विद्यार्थी संख्येमध्ये लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, या हेतूने शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर पुन्हा इयत्ता पाचवीऐवजी चौथी व आठवीऐवजी सातवी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने समावेशक बाबींचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे.

### अटी व शर्ती

प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेकरिता शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळांमधील विद्यार्थी परीक्षा देण्यास पात्र राहतील. सीबीएसई, आईसीएसई आणि इतर अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ट होण्यासाठी अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी, तसेच तो इयत्ता चौथी किंवा इयत्ता सातवीत शिकत असावा. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे १ जून रोजी कमाल वय १० वर्षे तर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी १४ वर्षांपेक्षा जास्त नसावे. तर उच्च प्राथमिकसाठी सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे वय १३ वर्षे तर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी १७ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

# कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उषःकाल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

### सुडोकु - 84

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | | 6 | 9 |
| | | 3 | 2 | | | | 8 | 1 |
| | | | 6 | | | 4 | | |
| 1 | 5 | 7 | | | | 6 | 9 | |
| | | | | 7 | | 8 | | 2 |
| 2 | | 4 | | 1 | 6 | | | |
| 5 | | | | | 3 | 7 | 2 | 8 |
| 6 | | 2 | 8 | 9 | 4 | | 3 | |
| 8 | 3 | 1 | 5 | 2 | | | 4 | |

# समर्थ महाप्रसाद लाभार्थ्यांसाठी दिवाळी फराळ किट वाटपाचा उपक्रम



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सुरु असलेल्या समर्थ महाप्रसाद सेवेच्या लाभार्थ्यांना आपुलकी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था व नव भारत मित्र मंडळ, कारंजा चौक यांच्या वतीने दिपावली निमित्त फराळ किट देण्यात आले.

दरम्यान श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने समर्थ महाप्रसाद सेवेच्या लाभार्थ्यांना किट आपुलकी संस्थेकडून न्यासास सुपूर्त करण्यात आले. यावेळी मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, आपुलकी संस्थेचे विशाल (मुन्ना) राठौर, अविराज सिद्धे, अप्पू कलशेट्टी, शैलेश राठौर, अंबादास निंबाळे, अनिल बिडवे, अमर पाटील, महेश लोकापुरे, अमोल कोळी, विष्णू शिंपाळे, प्रकाश टाके, रुपेश कपुरे, सलीम हगलदिवटे, समर्थ आळगी, राहुल राठौर, संतोष राठौर, बालाजी सुरवसे, नितीन कटारे, शिवराज स्वामी, मल्लय्या स्वामी, आर्यन राठौर, विराज राठौर, आशिष राठौर, शिवलिंग कलबुर्गी, शक्ती पाटील, अमित पाटील, सुरेश कतनाळी यांच्या सह मैनुद्दीन कोरबू, सौरभ मोरे, भारत पाटील, बाळासाहेब पोळ, निखील पाटील, योगेश कटारे, प्रवीण घाडगे, गोटू माने यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# व्हि. आर. पवार मध्ये पारंपारिक पद्धतीने लक्ष्मीपूजन मोठ्या उत्साहात- राजेश पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** येथील साडी म्हटले की व्हि. आर. पवार आणि व्हि. आर. पवार म्हटले की साडी असे समीकरण झालेले महाराष्ट्रातील एकमेव नाव म्हणजे सोलापुरातील व्हि. आर. पवार होय या भव्य शोरूम मध्ये दीपावलीनिमित्त माता लक्ष्मी देवीचे पारंपरिक पद्धतीने पूजन करण्यात आले असल्याचे राजेश पवार यांनी सांगितले.

चाटी गल्ली येथील सुप्रसिद्ध अशा व्ही. आर. पवार साडी शोरूम मध्ये दीपावलीनिमित्त लक्ष्मीपूजन उत्साहात संपन्न झाले. यावेळी व्हि. आर. सारीज चे प्रमुख रमेश पवार, अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार उपस्थित होते.

पूजनाची सुरुवात गणेश आरतीने करण्यात आली त्यानंतर भीमसेन जोशी यांचे अभंग भाग्यदा लक्ष्मी बारम्मा हे आरती चे गाणे पारंपरिक पद्धतीने म्हणून लक्ष्मी देवीची पूजा मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाला.

यावेळी व्हि. आर. पवार यांच्या परिवारातील सर्व सदस्य, सर्व कर्मचारी कृपया भक्ती भवानी या पूजनात सामील झाले होते.

# शेतकऱ्यांना १०६ कोटींची नुकसानभरपाई

## अक्कलकोटला सर्वाधिक मदत - आ सचिन कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून एकूण १०६ कोटी ५८ लाख ६१ हजार ६८७ रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली असून, ती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनाही येत्या दोन ते तीन दिवसांत रक्कम खात्यात जमा होणार असल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पाडव्याच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेत दिली.

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील एकूण बाधित शेतकऱ्यांची संख्या १ लाख ३ हजार ७७९ इतकी आहे. त्यापैकी ९९ हजार ८०८ शेतकऱ्यांना शेतीतील नुकसान, १ हजार ४६९ जणांच्या घरात पाणी शिरल्याने बाधा, तर २ हजार ४७३ शेतकऱ्यांची घरे पडझडीत कोसळली आहेत. तसेच २९ जनावरे मृत्यूमुखी पडल्याची नोंद प्रशासनाकडे आहे.

शेतकऱ्यांना मिळणाऱ्या एकूण रकमेपैकी १०३ कोटी ६१ लाख १२ हजार १८७ रुपये शेती नुकसानभरपाईसाठी, १ कोटी ४६ लाख ९० हजार रुपये घरात पाणी शिरल्यामुळे, तर १ कोटी ४१ लाख ४२ हजार रुपये घर पडझडीसाठी वितरित होणार आहेत. याशिवाय मृत जनावरांसाठी ९ लाख १७ हजार ५०० रुपये मदत म्हणून मंजूर झाले आहेत.

या सर्व योजनांअंतर्गत सध्या ६१ हजार खातेदारांच्या याद्या ऑनलाइन अपलोड केल्या गेल्या असून, अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत सर्व शेतकऱ्यांना ही मदत पोहोचेल, असा विश्वास आमदार कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला.

अक्कलकोट मतदारसंघातील एकूण १ लाख १२ हजार ७५० हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले होते. विशेषतः बोरी, हरणा आणि भीमा नदीकाठच्या भागात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते.


या सर्व परिस्थितीचा विचार करून राज्य सरकारने दोन हेक्टरपर्यंतच्या शेतजमिनींसाठी नुकसानभरपाई निश्चित केली आहे. यानंतर एक हेक्टरपर्यंतची वाढीव मयार्दा लागू करण्याचा निर्णयही झाला असून, त्यामुळे शेतकऱ्यांना एकूण तीन हेक्टरपर्यंत भरपाईचा लाभ मिळणार आहे. या निर्णयाचे स्वागत करताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारने घेतलेला हा निर्णय शेतकऱ्यांच्या आयुष्यात दिलासा देणारा ठरेल.

अक्कलकोट तालुक्यातील नुकसानग्रस्त क्षेत्रात प्रशासनाने २४ तास कार्यरत राहून सर्व पंचनामे पूर्ण केले. महसूल विभाग, कृषी अधिकारी, ग्रामपंचायती आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे नुकसानभरपाई प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली असल्याचे आमदारांनी सांगितले.

अक्कलकोट तालुक्याला मिळालेली नुकसानभरपाई ही संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक रक्कम आहे, हे आमच्या क्षेत्रासाठी अभिमानास्पद आहे,असेही आमदार कल्याणशेट्टी म्हणाले.सरकारने शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जे प्रयत्न केले, त्याचा खरा लाभ येत्या काही दिवसांत दिसून येईल.ऐन दिवाळीत शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा होत असल्याने ही दिवाळी त्यांच्या चेहऱ्यावर खरा उजेड आणणारी ठरेल, असे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेत माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, भाजप शहर मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील,माजी तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड,माजी शहराध्यक्ष शिवशरण जोजन आदी उपस्थित होते.

# लोकनेते स्व. ब्रम्हानंद मोरे समाजसेवा प्रतिष्ठानच्या वतीने एप्रोन वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** लोकनेते स्व. ब्रम्हानंद मोरे समाजसेवा प्रतिष्ठान सोलापूर तर्फे आमदार विजयकुमार (मालक) देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आशा स्वयंसेविका यांना एप्रोन (Apron) वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले.आमदार विजयकुमार देशमुख तसेच मोरे प्रतिष्ठान चे अध्यक्ष बाळासाहेब मोरे, कार्याध्यक्ष प्रमोद मोरे यांच्या हस्ते दि. 21/10/2025 रोजी सकाळी 10.15 वाजता आमदार विजयकुमार देशमुख यांच्या कार्यालय नवी पेठ सोलापूर येथे सर्व आशा स्वयंसेविका यांना एप्रोन (Apron) वाटप झाले.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सोलापूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या 601 सर्व आशा स्वयंसेविका यांना दिवाळी भेट म्हणून हे ॲप्रॉन देण्यात आले. आशा स्वयंसेविका यांच्या सेवा, समर्पण, व संघर्ष करणाऱ्या आशा सेविकांना सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी नरेंद्र काळे, संजय कोळी, प्रसाद कुलकर्णी, शिवानंद पाटील, दिनेश घोडके, व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमचे प्रास्ताविक प्रतिष्ठान चे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी केले तर हा कार्यक्रम प्रतिष्ठान चे आधारस्थंभ व कार्याध्यक्ष प्रमोद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. संजय टोंपे यांनी केले. व कार्यक्रमाचा समारोप सर्वांना दूध वाटापाने करण्यात आला.

# अकलूज पोलीस ठाणे हद्दीतील सहा इसमांना केले हद्दपार



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी, अकलुज पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण हद्दीतील ०६ इसमांना हद्दपार केले असून,सर्वस्तरातून त्यांचे कौतुक होताना दिसत आहे.सदर हद्दपारचा प्रस्ताव अकलूज पोलीस ठाण्याचे कर्तव्यनिष्ठ पोलीस निरीक्षक नीरज उबाळे यांनी सादर केला होता.

अकलूज पोलीस ठाणे कडून मिळालेल्या माहितीनुसार,अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेकडे, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ५५ अन्वये अकलुज ता. माळशिरस येथील बळजोरी करून, दहशत निर्माण करून, शरिराविषयी गंभीर गुन्हे, विनयभंगाचे गुन्हे, शेतकऱ्यांची जनावरे घेवुन पैसे न देता, आर्थिक फसवणुक करणे, इच्छापुर्वक दुखापत पोहोचवणे, मारामारीचे गुन्हे करणारे गुन्हेगार टोळीस, हद्दपार करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस निरीक्षक,निरज उबाळे, अकलुज पोलीस ठाणे, यांनी सादर केला होता, यातील टोळी प्रमुख व टोळी सदस्य यांचेवर अकलुज पोलीस ठाणे, सातारा शहर पोलीस ठाणे जि. सातारा, श्रीरामपुर पोलीस ठाणे जि. अहिल्यानगर येथे गंभीर स्वरूपाचे शरीराविषयी व फसवणुकीचे गुन्हे दाखल होते.

यातील टोळी प्रमुख करण अभिमान उर्फ अभिमन्य पवार रा. जुना बाजार तळ, अकलूज ता. माळशिरस, टोळी सदस्य बंटी उर्फ अभिषेक अभिमान उर्फ अभिमन्य पवार रा. जुना बाजारतळ अकलूज ता. माळशिरस, टोळी सदस्य विठठल उर्फ ओंकार सोमनाथ यादव रा. अकलुज ता. माळशिरस, टोळी सदस्य सागर अतुल पावसे रा. अकलुज ता. माळशिरस, टोळी सदस्य विजय शंकर नायडु रा. संग्रामनगर ता. माळशिरस, टोळी सदस्य आयान ख्वाजा तांबोळी रा. संग्रामनगर ता. माळशिरस अशी टोळी आहे. त्यांनी अकलुज शहरात शरिराविषयी गंभीर गुन्हे, विनयभंगाचे गुन्हे, शेतकऱ्यांची जनावरे घेवुन पैसे न देता आर्थिक फसवणुक करणे, इच्छापुर्वक दुखापत पोहोचवणे, मारामारीचे गुन्हे करणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे केले होते. सदर टोळीने संघटीतरित्या एकत्र येवून तर कधी टोळीचा सदस्य म्हणुन स्वतंत्ररित्या गुन्हे करून, सामाजीक स्वास्थ बिघवडत केले होते व टोळीची दहशत निर्माण करत होते. सदर प्रस्तावाची सुनावणी अतुल कुलकर्णी हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांचे समक्ष होवून, टोळीस सोलापूर जिल्हयातुन ०६ महिन्या करीता हद्दपार करण्यात आले आहे.

तरी याव्दारे नागरीकांना आव्हान करण्यात येते की, नमुद हदद्वार इसम हे त्यांना हद्दपार करण्यात आलेल्या क्षेत्रात, वावरत असल्याचे आढळल्यास त्याबाबतची माहिती तत्काळ संबधीत पोलीस ठाणेस व नियंत्रण कक्ष सोलापूर ग्रामीण येथे कळवावे. तसेच भविष्यात देखील दोन पेक्षा जास्त गुन्हे दाखल असणाऱ्या इसमा विरुध्द अभीलेख तयार करण्यात आले असुन त्यांचे विरुध्द प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती अकलूज पोलीस ठाण्याचे निरीक्षक नीरज उबाळे यांनी दिली.

# बालाजी अमाईन्सकडून इलेक्ट्रिक वाहनाचे लोकार्पण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** बालाजी अमाईन्सच्या २१ अंतर्गत श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयासरुग्णांना अंतर्गत वाहतुक करण्याकरिता ev ॲम्ब्युलन्स भेट देण्याचा कार्यक्रम दि. २१/१०/२०२५ रोजी सकाळी रुग्णालयातील बी ब्लॉक येथे पार पडला.

बालाजी अमाईन्सचे सहव्यवस्थापकिय संचालक एन. राजेश्वर रेड्डी यांचे हस्ते वाहनांची चावी अधिष्ठाता जयकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक डी राम रेड्डी व स्वतंत्र संचालिका डॉ. सुहासिनी शहा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना अधिष्ठाता जयकर यांनी सांगितले कि, रुग्णालयातील अ, इ व उ ब्लॉक तसेच ओपीडी मधील पेशंटचे स्थलांतर करण्याकरिता इलेक्ट्रिक वाहनांची मागणी बालाजी अमाईन्सकडे केली होती, त्यास सकारात्मक प्रतिसाद देत व्यवस्थापकिय संचालक डी. राम रेड्डी यांनी त्वरित एक इलेक्ट्रिक वाहन रुग्णालयास उपलब्ध करुन दिले, रुग्णालयाच्या वतीने त्यांनी बालाजी अमाईन्सचे यावेळी आभार मानले.

यावेळी बोलताना बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले कि, रुग्णालयाचे परिसर मोठे आहे, रुग्णाला एका ब्लॉक मधून दुसऱ्या ब्लॉक मध्ये ने आण करण्यासाठी वेळ लागतो त्यांना त्रास होतो हे कुठे तरि कमी व्हावा या उद्देशाने आम्ही ताबडतोब रुग्णालयाचा प्रस्ताव मंजूर करुन इलेक्ट्रिक वाहन उपलब्ध करुन दिले.

या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. संपत्ती तोडकर, डॉ. अग्रजा चिटणीस, डॉ विठ्ठल घोडके, डॉ नितीन भोगे, बालाजी अमाईन्सचे अनिल विपत, प्रसाद सांजेकर उपस्थित होते.

# महापालिकेत मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्यासाठी मोठ्या ताकदीने प्रयत्न करा : कृषीमंत्री भरणे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारींची महत्त्वपूर्ण बैठक आज शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. या बैठकीत राज्याचे कृषी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर संपर्क मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांनी उपस्थित पदाधिकारींना मार्गदर्शन केले.

भरणे मामा म्हणाले की, 'सोलापूर शहरातील सर्व 26 प्रभागांतील 102 उमेदवार उभे करण्याची तयारी करा. प्रभागात, वॉर्डात जा, लोकांपर्यंत पोहोचा, त्यांची कामे करा आणि संवाद साधा. आपण महायुतीचा भाग असलो तरी स्वबळावरची तयारी ठेवा. महापालिकेच्या निवडणुकीत लढण्याचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील, आणि त्या निर्णयाचे पालन करण्यात येईल.'

बैठकीत माजी नगरसेवक तौफिक शेख यांनी सांगितले की, 'आम्ही रडणारे कार्यकर्ते नाही, लढणारे आहोत. निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे.'

प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे म्हणाले की, 'लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीने सोलापूर शहरातील महायुतीच्या सर्व उमेदवारांचे मनापासून काम केले आहे. त्यामुळे महापालिकेत आम्ही स्वबळावर किंवा महायुतीतून लढण्यास तयार आहोत. जिल्हाध्यक्ष संतोष पवार हे सर्वांना सोबत घेऊन चांगल्या पद्धतीने काम करीत आहेत.'

कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी सांगितले की, ह्लराष्ट्रवादीच्या सर्व ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन लवकरच प्रभाग यात्रा काढण्यात येणार आहे. त्याची तयारी झाली आहे.'

तर प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी स्पष्ट केले की, 'महायुती झाली तरी लढू आणि न झाली तरीही आम्ही मोठ्या ताकदीने लढण्याची तयारी ठेवली आहे.'

बैठकीत जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले की, 'राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष राज्यभर शिव–फुले–शाहू–आंबेडकर या विचारधारेवर काम करीत आहे. भरणे मामा आपण कोरोनाच्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता सोलापूरकरांची सेवा केली, त्यामुळे सोलापूरकरांशी आपले अतूट नाते निर्माण झाले आहे. याचा निश्चितच राष्ट्रवादीला फायदा होईल.'

पुढे ते म्हणाले, 'सोलापूर शहरातील सर्व ज्येष्ठ नेते, फ्रंटल सेलचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी यांना सोबत घेऊन प्रभाग यात्रा आणि 'राष्ट्रवादी परिवार मिलन' उपक्रम राबविण्यात येईल. सर्व 26 प्रभागांतील उमेदवारांची निवड प्रक्रिया सुरू असून त्याचा अहवाल कृषीमंत्री भरणे यांच्याकडे सादर करण्यात येईल.'

या बैठकीस शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, ग्रामीण जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश सरचिटणीस लतीफ तांबोळी, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक तौफिक शेख, राष्ट्रीय सेवादल उपाध्यक्ष चंद्रकांत दायमा, अल्पसंख्यांक आयोग सदस्य वसीम बुऱ्हाण, जेष्ठ नेते मकबूल मोहोळकर, माजी सभापती आनंद मुस्तारे, राष्ट्रीय सचिव फारूक मटके, माजी नगरसेवक सलिम पामा, नूतन गायकवाड, वाहिदबी शेख, तस्लिम शेख, प्रदेश सचिव इरफान शेख, महिला आघाडी अध्यक्षा संगीता जोगधनकर, युवक अध्यक्ष सुहास कदम, युवती अध्यक्ष किरण माशाळकर यांच्यासह शहरातील विविध सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरोग्य योजनांच्या एकत्रीकरणासाठी 'वॉर रूम' ची स्थापना

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):–** राज्यातील विविध आरोग्य योजनांचा समन्वय साधण्यासाठी, दुहेरी लाभ टाळण्यासाठी आणि सर्व आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी एकाच छताखाली प्रभावीपणे करण्यासाठी 'वॉर रूम' स्थापन करण्यात येत आहे. ही वॉर रूम' मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या देखरेखीखाली कार्य करणार असून, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली हा कक्ष स्थापन केला जाणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश राज्यातील विविध आरोग्य योजनांचे सुसूत्रीकरण, पारदर्शकता आणि तातडीने मदत उपलब्ध करून देणे हा आहे. सध्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना आदी इतरही योजना नागरिकांना मोफत किंवा सवलतीत उपचारांची सुविधा देतात. मात्र काही प्रकरणांमध्ये एकाच रुग्णाने दोन किंवा अधिक योजनांचा लाभ घेतल्याची नोंद झाल्याने शासकीय निधीचा अपव्यय टाळण्यासाठी आणि योजनांची समन्वित अंमलबजावणी करण्यासाठी ही वॉर रूम स्थापन करण्यात येणार आहे. नागरिकांना राज्य व केंद्र शासनाच्या सर्व आरोग्य योजनांविषयी माहिती, मार्गदर्शन आणि मदत मिळावी यासाठी एकच सामान्य टोल-फ्री क्रमांक – 1800 123 2211 उपलब्ध करून देण्यात आला आहे. या क्रमांकावरून नागरिकांना तात्काळ माहिती, मार्गदर्शन आणि आवश्यक मदत मिळणार आहे. सर्व अर्ज, शंका व तक्रारींचे निवारण या वॉर रूमच्या माध्यमातून केले जाणार असून, त्यावर मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाचे थेट नियंत्रण राहणार आहे.

**समितीची रचना**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची प्रभावी, जलद आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी तसेच दुहेरी लाभ आणि अपात्र प्रकरणे टाळण्यासाठी मुख्यमंत्री सचिवालयात उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या 12 सदस्यीय समितीच्या अध्यक्षस्थानी, प्रवीण परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) तर, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, महिला व बालविकास, कामगार, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास, दिव्यांग कल्याण आणि विधि व न्याय विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव तसेच, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख हे सदस्य म्हणून नियुक्त आहेत. त्याचप्रमाणे सहाय्यक संचालक, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या सर्वच आरोग्य योजनांचे एकत्रीकरण आणि पारदर्शकतेतून गरजू रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार देण्यासाठी नियमित प्रयत्न सुरू आहेत. त्यातूनच या 'वॉर रूम' ची स्थापना करण्यात येत आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या पात्रतेनुसार योग्य योजनेचा लाभ मिळावा आणि खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत 'निधी'पोहोचावा, यासाठी हा उपक्रम निश्चितच उपयोगी ठरणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# पोलीस स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अभिवादन



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत व प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित यांनी देखील पोलीस स्मृतिस्तंभाजवळ जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संदेश वाचनातून गेल्या वर्षभरात देशात हौतात्म्य प्राप्त झालेल्या ३४ पोलीस अधिकारी व १५७ पोलीस अंमलदार अशा एकूण १९१ वीर शहीदांना त्यांच्या अतुलनीय बलिदानाबद्दल श्रद्धांजली वाहिली.

यावेळी शहीद झालेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांची नावे वाचनानंतर पोलीस बँड पथकाद्वारे सलामी शस्त्र धून वाजविण्यात आली. तसेच गणवेशधारी अधिकारी व जवानांनी सलामी दिली. पोलिसांतर्फे अभिवादन म्हणून बंदुकीच्या तीन फैरी झाडण्यात आल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी निमंत्रित देश–विदेशी पाहुणे, वरिष्ठ पोलीस अधिकारी व हुतात्म्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

# राज्याचा महसूल विभाग देशात सर्वोत्तम ठरेल- बावनकुळे



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):–** महसूल विभाग अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न होत आहे. मागील काही महिन्यांमध्ये विविध लोकहिताचे निर्णय घेण्यात आले आहेत. या माध्यमातून होत असलेल्या कामाच्या पार्श्वभूमीवर राज्याचा महसूल विभाग येत्या काळात देशात सर्वोत्तम ठरेल, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. दिवाळीचा सण साजरा करीत असताना आपत्तीग्रस्तांच्या घरातही आनंदाचा एक दिवा पेटेल यासाठी सामाजिक जाणिवेतून काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर मागील काही महिन्यात मंत्रालयातील तसेच क्षेत्रीय पातळीवरील महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी याचबरोबर जमाबंदी आयुक्त तसेच नोंदणी महानिरीक्षक कार्यालयांतर्गत यंत्रणेने सेवा पंधरवडा, वाळू धोरण, पाणंद रस्ते, सर्वांसाठी घरे, तुकडेबंदी, जिवंत सातबारा, स्थानिक विषय आदींमध्ये प्रचंड काम केल्याबद्दल त्यांनी संपूर्ण यंत्रणेचे कौतुक केले. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्यासह मंत्रालयीन अधिकारी यावेळी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

सर्वसामान्यांना वाळू तातडीने उपलब्ध व्हावी यासाठी वाळू धोरणाचे पालन करून नोव्हेंबर अखेरपर्यंत सर्व वाळू गटांची लिलाव प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले. मदत व पुनर्वसन विभागामार्फत आपत्तीग्रस्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मदतीच्या निधीचे योग्य वितरण करावे, असेही त्यांनी सांगितले. पुढील वर्षात नागरिकांच्या फायद्यासाठी महसूल विभागांतर्गत ज्या नियमांमध्ये, कायद्यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, त्या सुचविण्याचे आवाहन त्यांनी यंत्रणेला केले. विभागातील अनेक पदांच्या पदोन्नत्या झाल्या असून येत्या तीन महिन्यात विभागातील उर्वरित पदांच्या पदोन्नत्यांची प्रक्रिया पूर्ण होईल, असेही त्यांनी सांगितले.

अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी नागरिकांची वाळूची गरज लक्षात घेऊन सर्व वाळू गटांची निविदा, कायार्देश आणि लिलाव प्रक्रिया नोव्हेंबर महिन्यात पूर्ण करावी, अशी सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना केली. महसूल विभागाची विश्वासार्हता वाढविण्यासाठी शासनाचे आदेश तसेच नागरिकांच्या निवेदनांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.